# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:16.06.2026** **वार:मंगळवार**

1. पंतप्रधान आज फ्रान्समध्ये जी सात देशांच्या परिषदेला उपस्थित राहणार
2. राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन 22 जून ते 10 जुलै या कालावधीत मुंबईत
3. पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वे सेवेला उद्यापासून प्रारंभ आणि
4. विदर्भ वगळता राज्यात इतरत्र नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात, शाळा प्रवेशोत्सवाद्वारे विद्यार्थ्यांचे स्वागत

**जी-7 शिखर परिषद**

52व्या जी-सेव्हन परिषदेला काल, फ्रांस मधील एवीयन शहरात प्रारंभ झाला. या परिषदेत, जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांचे नेते महत्वाच्या आंतरराष्ट्रीय आव्हानांवर चर्चा करणार आहेत. या परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी एवीयनमध्ये दाखल झाले आहेत. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी, जी-7 सदस्य देशांचे नेते, जागतिक बँकेचे प्रतिनिधी, तसंच विविध देशांच्या प्रमुख नेत्यांचीही भेट घेणार आहेत.

तत्पूर्वी काल पंतप्रधानांनी स्लोव्हाकियाची राजधानी ब्रातिस्लावा इथे स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्या समवेत द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांमध्ये विविध क्षेत्रात सामंजस्य करार झाले.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल स्लोव्हाकियाचा द ऑर्डर ऑफ द व्हाइट क्रॉस, फर्स्ट क्लास हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

**पश्चिम आशिया संघर्ष समाप्ती**

इराण आणि अमेरिका यांच्यात शांतता करार करायला दोन्ही देशांनी सहमती दर्शवली आहे. 19 जूनला स्वित्झर्लंड इथं शांतता कराराच्या अंतिम मसुद्यावर स्वाक्षऱ्या होणार आहेत. पश्चिम आशियातील संघर्ष संपवण्यासाठी होत असलेल्या या कराराचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं आहे. दरम्यान अमेरिका-इराण यांच्यात शस्त्रसंधीचे संकेत मिळाल्यानंतर देशातल्या शेअर बाजारात काल मोठी तेजी दिसून आली.

**पावसाळी अधिवेशन**

राज्य विधिमंडळाच आगामी पावसाळी अधिवेशन 22 जून ते 10 जुलै या कालावधीत मुंबईतील विधानभवनात भरणार आहे. कामकाज सल्लागार समितीच्या काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. विधानसभा आणि विधान परिषदेच्या कामकाजासंदर्भात झालेल्या स्वतंत्र बैठकांमध्ये हा निर्णय करण्यात आला. तीन आठवड्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयके, जनहिताचे प्रश्न आणि शासकीय

कामकाज पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलं आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जमाफीचे विषय चर्चेला येण्याची शक्यता आहे. तसंच, महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख देणार महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक मांडलं जाणार आहे.

**मोहोळ**

केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात पत्रकार परिषद घेऊन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या गेल्या 12 वर्षांच्या कार्याचा लेखा जोखा मांडला. जन-धन, उज्ज्वला, पीएम आवास यासारख्या योजना, पायाभूत सुविधांचा विकास यामुले नागरिकांचं आयुष्य अधिक सुलभ झाल्याचं ते म्हणाले. पुण्यातील मेट्रो प्रकल्पाचं, पुणे विमानतळाचं विस्तारीकरण, 1 हजार ई-बसेसना मंजूरी आदि निर्णयांचाही त्यांनी विशेष उल्लेख केला.

**रेल्वे सेवा**

पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वे सेवा उद्यापासून सुरू होत आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते पुण्यात उद्या या रेल्वे सेवेचा प्रारंभ होणार आहे. अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर खासदार नीलेश लंके रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. पुणे, अहिल्यानगर आणि साईनगर शिर्डी परिसरातील प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक तसंच साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ही रेल्वेसेवा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**योग दिन**

येत्या 21 जून रोजी साजरा होणाऱ्या बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली कोलकाता इथं होणार आहे. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी काल दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. संस्कृती मंत्रालयातर्फे देशभरातल्या 100 प्रसिद्ध ऐतिहासिक वारसा स्थळांवर तसंच परराष्ट्र मंत्रालयातर्फे जगभरात अडीच हजार ठिकाणी योग दिनाच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येत असल्याची माहिती जाधव यांनी दिली.

**मिफ्फ**

एकोणिसाव्या मिफ्फ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला काल मुंबईत सुरुवात झाली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरूगन, राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲडव्होकेट आशीष शेलार यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत महोत्सवाचं उद्घाटन करण्यात आलं. यावर्षीच्या स्पर्धा विभागात 144 चित्रपटांचा समावेश आहे. यात 13 देशांतल्या 52 आंतरराष्ट्रीय आणि 92 राष्ट्रीय प्रवेशिकांचा समावेश आहे. तर, स्पर्धाबाह्य विभागात 46 सहभागी देशांतले एकंदर 202 चित्रपट दाखवण्यात येतील. या वर्षी या महोत्सवात 'मराठी चित्रपट' आणि 'एकोज फ्रॉम नॉर्थ ईस्ट' असे दोन विभाग सुरू करण्यात आले आहते. मिफ्फ मध्ये प्रथमच 'ए आय सिनेमा हॅकेथॉन' आयोजित करण्यात आली असून, त्यात, 48 तासांत चित्रपट निर्मितीचं आव्हान देण्यात आलं आहे.

**शाळा सुरू**

उन्हाळी सुट्टीनंतर विदर्भ वगळता राज्यातल्या इतर सर्व विभागातल्या शाळा काल पुन्हा विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने फुलून गेल्या. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचं पुष्पगुच्छ तसंच पेढे देऊन स्वागत करण्यात आलं. काही ठिकाणी ढोल-ताशांच्या गजरात, तर काही ठिकाणी तुतारी संबळाच्या निनादात स्वागत करून प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. राज्यातल्या शाळा प्रवेशोत्सावाचा सविस्तर वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून.....

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा इथल्या मुंबई पब्लिक स्कूलमध्ये राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी प्रवोशोत्सवात भाग घेत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत येऊन जिज्ञासू वृत्ती जोपासावी, प्रश्न विचारावेत आणि शिक्षणासोबतच मूल्याधिष्ठित संस्कार आणि कौशल्ये आत्मसात करावीत, असं आवाहन राज्यपालांनी केलं.**
**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या वहाळ इथल्या पी.एम.श्री. प्राथमिक शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. नव्याने उभारण्यात आलेल्या 'आयडियल सेंटर'चं उदघाटनही फडणवीस यांनी केलं. जिल्हा परिषद शाळांमध्ये आता मूल्याधारित शिक्षण सुरु करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. या शाळेतल्या एका विद्यार्थिनीने मुख्यमंत्र्यांची छोटी मुलाखतही घेतली. विद्यार्थी आणि शिक्षकांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले.....**

**एक काळ होता की जिल्हा परिषदेची शाळा म्हटल्यानंतर ती शाळा अतिशय मोडकळीस आलेली व्यवस्था नसलेली अशा प्रकारची शाळा आपल्याला पाहायला मिळायची पण आज आपण महाराष्ट्रातल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जाऊन बघू शकतो बहुतांश शाळा या कुठल्याही खासगी शाळेसारख्या किंवा कधीही त्याहीपेक्षा चांगल्या आपल्याला पाहायला मिळतात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मूल्यशिक्षण देखील सुरू केलं आहे संवैधानिक मूल्य ही आमच्या मुलांना माहिती असली पाहिजे हक्क आणि कर्तव्याची जाणीव असली पाहिजे. स्वच्छता, पर्यावरण या संदर्भातली जागृती असली पाहिजे. एक अतिशय चांगला भावी नागरिक हा या शाळांमध्ये तयार झाला पाहिजे हा आपला प्रयत्न आहे.**

**'अभ्यासाचं टेन्शन घ्यायचं नाही, बिंधास्त अभ्यास करायचा' असं सांगत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महानगरपालिकेच्या किसननगर येथील पालिका शाळा क्रमांक 23 मध्ये,आठवणी जागवल्या.**
**तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पीएम श्री आदर्श केंद्र जिल्हा परिषद शाळेतील प्रवेशोत्सवामध्ये सहभागी होत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.**
**राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातल्या तोरणमाळच्या दुर्गम भागातल्या नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत केलं.**
**तुळजापूर मध्ये नगरपरिषदेच्या दोन क्रमांकांच्या शाळेत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे घेऊन त्यांचं औक्षण करण्यात आलं. सोलापूर जिल्ह्यात करमाळा तालुक्यात ढोकरी इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत सर्व विद्यार्थ्यांचं फेटे बांधून तसंच ओवाळून स्वागत करण्यात आलं. सोलापूर आणि नाशिक जिल्ह्यात फुगे आणि फुलं लावून सजवलेल्या बैलगाडीतून विद्यार्थ्यांची**

**मिरवणूक काढण्यात आली. सिंधुदुर्ग, सांगली, रत्नागिरी, सातारा, धारशिव, नाशिक, जालना इथे देखील विविध मान्यवरांनी स्वतः शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचं स्वागत केलं.**

**आकाशवाणीच्या बातम्यांसाठी आमच्या ठिकठीकाणच्या वार्ताहरांसह प्रशांत जाधव पुणे**

**पुरवणी परीक्षा**

राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावी पुरवणी परीक्षेला आजपासून सुरूवात होत आहे. दहावीची परीक्षा 16 जून ते 30 जून दरम्यान आणि बारावीची परीक्षा 16 जून ते 8 जूलै दरम्यान होणार आहे.

**एस. टी. भाडे वाढ**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एस. टी. ने केलेली, सामान्य बस सेवांवरची, हंगामी 10 टक्के भाडेवाढ अजून एक महिना म्हणजे 15 जुलैच्या मध्यरात्री पर्यंत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. इंधनाचे वाढते दर आणि कर्मचाऱ्यांवरील वाढत्या खर्चामुळे दरवाढीची मुदत वाढवल्याचं महामंडळाने जारी केलेल्या निवेदनात म्हंटलं आहे.

**भीमाशंकर मंदिर**

भीमाशंकर मंदिर कालपासून दर्शनासाठी सुरु करण्यात आलं. दरोज एक हजार भाविकांना मंदिरात प्रवेश दिला जाईल. दर्शनासाठी पास आणि वैध ओळखपत्र अनिवार्य करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. मंदिर व्यवस्थापन समितीच्या shreebhimashankar.com या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर भाविकांना पास उपलब्ध होणार आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. कोकणात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी वादळी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.